Devrukh Shikshan Prasarak Mandal's
Nya. Tatyasaheb Athalye Arts, Ved. S. R. Sapre Commerce and Vid. Dadasaheb Pitre Science College, Devrukh. Tal.Sangmeshwar, Dist. Ratnagiri-415804
(Autonomous)

| Meeting of BOS in Marathi |
|---|
| 12 Feb. 2022 |

**MINUTES OF THE FIRST MEETING OF THE MARATHI BOARD OF STUDIES HELD AT NYA. TATYASAHEB ATHALYE ARTS, VED.S.R. SAPRE COMMERCE AND VID. DADASAHEB PITRE SCIENCE COLLEGE, DEVRUKH(AUTONOMOUS)**

**Date : 12 Feb. 2022**
**Time : 11:a.m. to 1:00 p.m.**
**Online Meeting**

शनिवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२२ रोजी आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत्त महाविद्‍यालय, देवरुखच्या मराठी विषयाच्या अभ्यासमंडळातील सदस्यांची सभा सकाळी ११ वाजता आभासी पद्‍धतीने (ऑनलाईन)आयोजित करण्यात आली. सभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरु झाले दुपारी १:०० वाजता संपले.

सभेस पुढील सभासद उपस्थित होते.

१. डॉ. वर्षा शिरीष फाटक अभ्यासमंडळ चेअरमन,
(सहयोगी प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख,आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्‍यालय)

२. प्रा.अजित जाधव सहायक प्राध्यापक,आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्‍यालय,देवरुख
३. डॉ. एल.बी.पाटील प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्‍यालय, करमाळा जि.सोलापूर
४. डॉ. तुकाराम रोंगटे सहयोगी प्राध्यापक,पुणे विद्‍यापीठ मराठी विभागप्रमुख
५. डॉ. राजश्री देशपांडे सहायक प्राध्यापक,फर्ग्युसन कॉलेज, पुणे
६. डॉ. नीतिन आरेकर सहयोगी प्राध्यापक, सी.एच.एम महाविद्‍यालय, मुंबई
७. डॉ. रणधीर शिंदे सहयोगी प्राध्यापक, शिवाजी विद्‍यापीठ मराठी विभागप्रमुख
८. डॉ. निधी पटवर्धन सहयोगी प्राध्यापक,गोगटे-जोगळेकर महाविद्‍यालय,रत्नागिरी

अभ्यासमंडळाच्या अध्यक्षा डॉ. वर्षा फाटक यांनी अभ्यासमंडळातील सदस्यांचे स्वागत केले आणि सभेच्या कामकाजास प्रारंभ करून सभेपुढील विषय व प्रथम मागील वर्षाच्या प्रथम वर्ष कलाच्या अभ्यासक्रमाची माहिती सदस्यांना दिली. अभ्यासक्रम तयार करताना ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्यांचे आकलन व परिसराच्या गरजा लक्षात घेऊन त्यांस उपयुक्त ठरेल असा अभ्यासक्रम करावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

सदर सभेत झालेली चर्चा व मंजूर करण्यात आलेले ठराव पुढीलप्रमाणे -

विषय क्रमांक १.

१२ मे २०२१ रोजी तृतीय वर्ष कलाच्या अभ्यासक्रमाच्या पुनर्रचनेबाबत झालेल्या अभ्यासमंडळाच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

दिनांक १२ मे २०२१ रोजी झालेल्या अभ्यासमंडळाच्या सभेचे इतिवृत्त प्रा. अजित जाधव यांनी वाचून दाखवले ते योग्य असल्याचे संकेत सभेकडून मिळाल्यावर पुढील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक १. ठराव करण्यात येतो की, दिनांक १२ मे २०२१ रोजी तृतीय वर्ष कलाच्या अभ्यासक्रमाच्या पुनर्रचनेबाबत झालेल्या अभ्यासमंडळाच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करून कायम करण्यात येत आहे.

सूचक: प्रा डॉ तुकाराम रोंगटे

अनुमोदक : प्रा. डॉ. निधी पटवर्धन

ठराव क्रमांक २. प्रथम वर्ष कला मराठीच्या जुन्या अभ्यासक्रमाचा आढावा

प्रा.डॉ. वर्षा फाटक यांनी प्रथम वर्ष कला मराठीच्या जुन्या अभ्यासक्रमाचा आढावा घेऊन प्रथम वर्ष कलाचा प्रस्तावित अभ्यासक्रम सर्वांसमोर चर्चेसाठी ठेवला. साहित्यकृती निवडताना विद्यार्थ्यांना उत्तमोतम साहित्यकृतींची, सद्यस्थितीतील सामाजिक व्यवहारांची व तत्कालीन घडामोडींची ओळख व्हावी या हेतूने चर्चेअंती पुढील साहित्यकृतींची निवड करण्यात आली. हा अभ्यासक्रम २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमाची श्रेयांकन पद्धतीनुसार रचना करण्यात आली आहे.

प्रथम वर्ष कला अभ्यासपत्रिका क्रमांक UAMARCOM10 व UAMARCOM20

मराठी अनिवार्य या अभ्यासपत्रिकेच्या प्रथम सत्रात लेखक आसाराम लोमटे यांचा 'इडा पिडा टळो' हा कथासंग्रह नेमण्यात यावा. उर्वरित व्यावहारिक अभ्यासक्रमाची रचना तशीच ठेवण्यात यावी.

द्वितीय सत्रात ‘एका रानवेड्याची शोधयात्रा’ हे कृष्णमेघ कुंटे यांचे प्रवासवर्णन अभ्यासक्रमात नेमण्यात यावे व उर्वरित व्यावहारिक अभ्यासक्रमाची रचना तशीच ठेवण्यात यावी. असे सूचित करण्यात आले.

Annexure १ मध्ये याबाबतचे विश्लेषण सोबत जोडले आहे.

या विषयावर झालेल्या चर्चेअंती वरील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक:- प्रा नीतिन आरेकर

अनुमोदक:- डॉ. रणधीर शिंदे

ठराव क्रमांक ३ प्रथम वर्ष कला अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR11 व UAMAR21

मराठी ऐच्छिक या अभ्यासपत्रिकेच्या प्रथम सत्रात 'आवडलेली माणसे' हा लेखक विद्याधर पुंडलिक यांचा व्यक्तिचित्रलेखसंग्रह निवडण्यात यावा.

तसेच द्वितीय सत्रात शान्ता शेळके यांचा 'फुलांचे दिवस कळ्यांच्या राती' या काव्यसंग्रहातील निवडक २० कविता निवडण्यात याव्यात. असे सर्वानुमते सूचित करण्यात आले.

या विषयावर झालेल्या चर्चेअंती वरील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक:- प्रा नीतिन आरेकर

अनुमोदक:- डॉ. राजश्री देशपांडे

ठराव क्रमांक ४ विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मूल्यमापनाबाबत चर्चा

विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप ठरविताना सत्राअखेरीस ७० गुणांची लेखी परीक्षा व ३० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन अशी प्रत्येक विषयपत्रिका १०० गुणांची असेल त्यामध्ये अंतर्गत मूल्यमापनामध्ये अभ्यासक्रमबाह्य वाङ्मयीन उपक्रम घ्यावेत जेणेकरून विद्यार्थी स्वयंअध्ययनास प्रवृत्त होतील. मराठी वाङ्मय मंडळाच्या विविध उप्रकमांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याचा सहभाग असेल असेच अंतर्गत मूल्यमापनाचे स्वरूप ठेवावे.

प्रथम वर्ष कलाच्या मराठी अनिवार्य विषयाचे अंतर्गत मूल्यमापन प्रथम सत्र व द्वितीय सत्र

या अंतर्गत नेमलेल्या साहित्यकृतीवर वा व्यावहारिक मराठीवर (वस्तुनिष्ठ प्रश्न/टीपा) १० गुणांची चाचणी घेण्यात येईल. नेमलेल्या कथालेखकाव्यतिरिक्त इतर लेखकाच्या साहित्यकृतीचा परिचय प्रकल्प वा प्रत्यक्ष सादरीकरण यासाठी १० गुण व वर्गातील उपस्थिती, मराठी वाङ्मय मंडळ तसेच यांसारख्या कार्यक्रमांत प्रत्यक्ष सहभाग यासाठी १० गुण अशा तऱ्हेने ३० गुणांसाठी केल्या जाणाऱ्या मूल्यमापनाची रूपरेषा सर्वानुमते ठरविण्यात आली.

द्वितीय सत्र अंतर्गत प्रवासवर्णन या साहित्यप्रकारावर वा अभ्यासक्रमात नेमलेल्या कोणत्याही द्वितीय सत्र द्वितीय सत्र अंतर्गत प्रवासवर्णन या साहित्यप्रकारावर वा अभ्यासक्रमात नेमलेल्या कोणत्याही प्रवासवर्णनपर लेखांवर आधारित १० गुणांची चाचणी (वस्तुनिष्ठ प्रश्न/टीपा) घेण्यात येईल. नेमलेल्या प्रवासवर्णनपर लेखांव्यतिरिक्त इतर लेखकांच्या प्रवासवर्णनपर लेखांचे सादरीकरण यासाठी १० गुण व वर्गातील उपस्थिती, मराठी वाङ्मय मंडळ तसेच यांसारख्या कार्यक्रमांत प्रत्यक्ष सहभाग यासाठी १० गुण

प्रथम वर्ष कलाच्या ऐच्छिक मराठी पेपर क्रमांक एक अंतर्गत मूल्यमापन प्रथम सत्र

प्रवासवर्णन या सैद्धांतिक साहित्यप्रकारावर वा अभ्यासक्रमास नेमलेल्या व्यक्तिचित्रांवर आधारित १० गुणांची चाचणी (वस्तुनिष्ठ प्रश्न/टीपा) घेण्यात येईल. नेमलेल्या व्यक्तिचित्रात्मक लेखांव्यतिरिक्त इतर व्यक्तिचित्रकारांव्यतिरिक्त व्यक्तिचित्रकारांकरांच्या व्यक्तिचित्रांचे वाचन वा

सादरीकरण यासाठी १० गुण व वर्गातील उपस्थिती, मराठी वाङ्मय मंडळ तसेच यांसारख्या कार्यक्रमांत प्रत्यक्ष सहभाग यासाठी १० गुण

व द्वितीय सत्र अंतर्गत कविता या साहित्यप्रकारावर वा अभ्यासक्रमात नेमलेल्या कोणत्याही कवितांवर आधारित १० गुणांची चाचणी (वस्तुनिष्ठ प्रश्न/टीपा) घेण्यात येईल. नेमलेल्या कवितांव्यतिरिक्त इतर कवींच्या कवितांचे सादरीकरण यासाठी १० गुण व वर्गातील उपस्थिती, मराठी वाङ्मय मंडळ तसेच यांसारख्या कार्यक्रमांत प्रत्यक्ष सहभाग

अशा तऱ्हेने ३० गुणांसाठी केल्या जाणाऱ्या मूल्यमापनाची रूपरेषा सर्वानुमते ठरविण्यात आली.

ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

सूचक डॉ तुकाराम रोंगटे

अनुमोदक डॉ. रणधीर शिंदे

ठराव क्रमांक ४ सत्राच्या अखेरीस होणाऱ्या लेखी परीक्षेबाबत चर्चा

सत्राच्या अखेरीस घेतल्या जाणाऱ्या ७० गुणांच्या परीक्षेचे स्वरूप पुढीलप्रमाणे

अनिवार्य मराठी प्रथम सत्र गुण ७० वेळ २ तास ३० मिनिटे

| अनु क्र | दीर्घोत्तरी प्रश्न | गुण |
|---|---|---|
| १. | 'इडा पिडा टळो' या कथासंग्रहावर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न अंतर्गत पर्यायासह | २० |
| २ | 'इडा पिडा टळो' या कथासंग्रहावर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न अंतर्गत पर्यायासह | २० |
| ३ | प्रमाणभाषा लेखन नियम व विरामचिन्हे अंतर्गत पर्यायासह | ०८ |
| ४ | वर्तमानपत्रासाठी वृत्त आणि वृत्तांत अंतर्गत पर्यायासह | ०७ |
| ५ | अर्जलेखन अंतर्गत पर्यायासह | ०८ |
| ६ | भाषांतर अंतर्गत पर्यायासह | ०७ |

अनिवार्य मराठी द्वितीय सत्र गुण ७० वेळ २ तास ३० मिनिटे

| अनु क्र | दीर्घोत्तरी प्रश्न | गुण |
|---|---|---|
| १. | ‘एका रानवेड्याची शोधयात्रा’ या प्रवासवर्णनावर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न अंतर्गत पर्यायासह | २० |
| २ | ‘एका रानवेड्याची शोधयात्रा’ या प्रवासवर्णनावर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न अंतर्गत पर्यायासह | २० |
| ३ | इतिवृत्तलेखन अंतर्गत पर्यायासह | ०८ |
| ४ | वर्तमानपत्रासाठी जाहिरातलेखन अंतर्गत पर्यायासह | ०७ |
| ५ | मुद्रितशोधन अंतर्गत पर्यायासह | ०८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | पुस्तकपरिचय अंतर्गत पर्यायासह | ०७ |

ऐच्छिक मराठी प्रथम सत्र गुण ७० वेळ २ तास ३० मिनिटे

| अनु क्र | दीर्घोत्तरी प्रश्न | गुण |
|---|---|---|
| १. | 'व्यक्तिचित्रे' या साहित्यप्रकारावर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न अंतर्गत पर्यायासह | २० |
| २ | “आवडलेली माणसे' या व्यक्तिचित्रात्मक लेखसंग्रहावर दीर्घोत्तरी प्रश्न अंतर्गत पर्यायासह | २० |
| ३ | ‘आवडलेली माणसे’ या व्यक्तिचित्रात्मक लेखसंग्रहावर दीर्घोत्तरी प्रश्न अंतर्गत पर्यायासह | २० |
| ४. | वरील तीनही युनिटवर टीपा चारपैकी दोन प्रत्येकी ५ गुण | १० |
| | एकूण गुण | ७० |

ऐच्छिक मराठी द्वितीय सत्र गुण ७० वेळ २ तास ३० मिनिटे

| अनु क्र | दीर्घोत्तरी प्रश्न | गुण |
|---|---|---|
| १. | 'कविता' या साहित्यप्रकारावर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न अंतर्गत पर्यायासह | २० |
| २ | अभ्यासक्रमात नेमलेल्या ‘फुलांचे दिवस कळ्यांच्या राती’ या काव्यसंग्रहातील अनुक्रमे एक ते दहा कवितांवर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न अंतर्गत पर्यायासह युनिट II | २० |
| ३ | अभ्यासक्रमात नेमलेल्या ‘फुलांचे दिवस कळ्यांच्या राती’ या काव्यसंग्रहातील अनुक्रमे अकरा ते वीस कवितांवर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न अंतर्गत पर्यायासह युनिट III | २० |
| ४. | वरीलपैकी दोन्ही युनिटवर आधारित चार टीपा त्यापैकी दोन टीपा प्रत्येकी ५ गुण | १० |
| | एकूण गुण | ७० |

अशा तऱ्हेने ७० गुणांसाठी केल्या जाणाऱ्या मूल्यमापनाची रूपरेषा सर्वानुमते ठरविण्यात आली.

ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

सूचक डॉ रणधीर शिंदे

अनुमोदक डॉ. निधी पटवर्धन

ठराव क्रमांक ५ बहिस्थ परीक्षक व पेपरसेटर्स यांचे मंडळ निश्चित करणे

विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षेचे पेपर तयार करणे, तपासणे व मॉडरेट करणे यासाठी मराठी विभागप्रमुखांनी विद्यापीठातील मान्यताप्राप्त महाविद्यालयांतील योग्य प्राध्यापकांची उपलब्धता व सुलभता लक्षात घेऊन नियुक्ती करावी. असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

सूचक डॉ. राजश्री देशपांडे

अनुमोदक डॉ.नीतिन आरेकर

ठराव क्र. ६ यावर्षी द्वितीय वर्ष कलाच्या मराठी २ या विषयाच्या अभ्यासक्रमातही भविष्यातील आव्हाने लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त असे बदल करण्यात आले. सदर अभ्यासक्रमात स्पर्धा परीक्षेस उपयुक्त ठरतील अशी भाषा लेखन कौशल्ये, मराठी व्याकरण,संगणकासाठी मराठी असे घटक निवडण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. Annexure २ मध्ये याबाबतचे विश्लेषण सोबत जोडले आहे.

ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

सूचक डॉ. राजश्री देशपांडे

अनुमोदक प्रा.निधी पटवर्धन

अशाप्रकारे प्रथम वर्ष कला मराठी विषयाचा अभ्यासक्रम सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक ७ कौशल्याधिष्ठित प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत विचारविनिमय

मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रात असणाऱ्या व्यवसाय व रोजगाराभिमुख संधी लक्षात घेऊन तशाच प्रकारचे उपयुक्त असे प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्याचे ठरविण्यात आले.

यामध्ये 'कार्यालयीन भाषा संकल्पना, स्वरूप, आणि पत्रलेखन' असा ३ श्रेयांकनाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम ठरविण्यात आला.

द्वितीय वर्ष कलासाठी 'अनुवाद सिद्धांत आणि व्यवहार' असा ३ श्रेयांकनाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम ठरविण्यात आला.

तृतीयवर्ष कलासाठी 'दृश्य-श्रव्य माध्यम लेखन' व शब्दांकन' असा ३ श्रेयांकनाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम ठरविण्यात आला.

तसेच कोणत्याही शाखेच्या विद्यार्थ्यांस सदर कौशल्याधिष्ठित प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्याचे स्वातंत्र्य राहील असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

सूचक डॉ. रणधीर शिंदे

अनुमोदक डॉ एल.बी.पाटील

ठराव क्रमांक ८. एकूण अभ्यासक्रमाचे फलित

प्रथम वर्ष कला मराठीच्या विद्यार्थ्यासाठी नेमलेला यावर्षीचा अभ्यासक्रम लक्षात घेऊन पुढील वर्षाचा अभ्यासक्रम त्यांच्या जाणिवा अधिक समृद्ध करणारा असेल हा दृष्टिकोण डोळ्यासमोर ठेवून अभ्यासक्रमाचे फलित पुढील गोष्टींना अनुसरून असावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

- विद्यार्थ्यांना वाचन, श्रवण व लेखन या तिन्ही कौशल्यांचे आकलन.
- साहित्याची अभिरुची व समज निर्माण.

- साहित्याचे समाजाशी असणारे अनुबंध व बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाची ओळख.
- जागतिकीकरण, महानगरीकरण यांचा नागरीजीवनावर होणारा परिणाम यांचे आकलन.
- भविष्यातील रोजगार व व्यवसायाच्या संधी मिळविता याव्यात अशीच कौशल्य विकसित करणारा अभ्यासक्रम असल्याने विविध कार्यालयांमधील व्यावहारिक पत्रव्यवहार, भाषांतर, अनुवाद व शब्दांकन या क्षेत्रात लेखनाच्या संधी, जाहिरात क्षेत्र, विविध दृक-श्राव्य माध्यमांवरील प्रसारणे, व्याख्याने व निवेदन, स्वतंत्र कार्यक्रम, संहितालेखन या क्षेत्रात सक्षमपणे कार्य करण्याची संधी.
- व्यावसायिक पत्रव्यवहार सादरीकरण कलांची ओळख व व्यावसायिक संधी.
- संशोधनाची आवड निर्माण.
- इव्हेंट मॅनेजमेंट कौशल्य आकलन व उपयोजन.

ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

सूचक डॉ. तुकाराम रोंगटे

अनुमोदक डॉ नीतीन आरेकर

प्रा.डॉ. वर्षा फाटक यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभेचा समारोप केला.

सही

डॉ. वर्षा शिरीष फाटक
चेअरमन
मराठी अभ्यासमंडळ
आठल्ये-सप्रे-पित्रे
स्वायत्त महाविद्यालय, देवरुख

**Devrukh Shikshan Prasarak Mandal's**

# Nya. Tatyasaheb Athalye Arts, Ved. S.R. Sapre Commerce and Vid. Dadasaheb Pitre Science College, (Autonomous) Devrukh,

**Dist: Ratnagiri- 415 804, Maharashtra**

## F.Y.B.A.

## (Marathi Compulsory)

## AS PER CHOICE BASED CREDIT SYSTEM (CBCS)

## TO BE FROM THE ACADEMIC YEAR 2022-2023

Annexure १

सत्र पहिले  एकूण व्याख्याने ३० श्रेयांकने २

| |
|---|
| घटक १ 'इडा पिडा टळो' आसाराम लोमटे शब्द प्रकाशन हा कथासंग्रह २० तासिका श्रेयांकन १ २० तासिका श्रेयांकन १ |
| घटक २ व्यावहारिक मराठी (४ घटकविषय ) तासिका १० श्रेयांकन १<br>१. प्रमाणभाषा लेखन नियम व विरामचिन्हे<br>२. वर्तमानपत्रासाठी वृत्त लेखन वृत्तांत लेखन<br>३. अर्जलेखन<br>४. भाषांतर (इंग्रजीतून मराठीत) |

द्वितीय सत्रात एकूण व्याख्याने ३० श्रेयांकने २

| |
|---|
| घटक १ 'एका रानवेड्याची शोधयात्रा' कृष्णमेघ कुंटे राजहंस प्रकाशन प्रवासवर्णन |
| घटक २ व्यावहारिक मराठी (४ घटकविषय ) तासिका १० श्रेयांकन १<br>१. इतिवृत्तलेखन<br>२. वर्तमानपत्रासाठी जाहिरातलेखन<br>३. मुद्रितशोधन<br>४. पुस्तकपरिचय |

**Devrukh Shikshan Prasarak Mandal's**
**Nya. Tatyasaheb Athalye Arts, Ved. S.R. Sapre Commerce and**
**Vid. Dadasaheb Pitre Science College**
**(Autonomous)**
**Devrukh, Dist: Ratnagiri- 415 804, Maharashtra**

---

# F.Y.B.A. (Marathi Ancillary)

## AS PER CHOICE BASED CREDIT SYSTEM (C.B.C.S.)

## TO BE FROM THE ACADEMIC YEAR 2022-2023

**Annexure २.**

**मराठी ऐच्छिक (Marathi Ancillary) विषयासाठी प्रथम सत्रात एकूण व्याख्याने ३० श्रेयांकने २**

| |
|---|
| व्यक्तिचित्रे' या साहित्यप्रकाराचा सैद्धांतिक परिचय (Form of Drama) एकूण व्याख्याने १५ श्रेयांकने १ |
| 'आवडलेली माणसे' (व्यक्तिचित्रे) विद्याधर पुंडलिक मौज प्रकाशन एकूण व्याख्याने १५ श्रेयांकने १ |

**द्वितीय सत्रात कविता एकूण व्याख्याने ३० श्रेयांकने २**

| |
|---|
| कविता या साहित्यप्रकाराचा परिचय |
| 'कळ्यांचे दिवस फुलांच्या राती' शान्ता शेळके यांच्या साहित्यकृतीतील निवडक २५ कविता सुरेश एजन्सी प्र.आ. १५ ऑगस्ट १९८६<br>१. जयशारदे वागेश्वरी<br>२. देव दिसला<br>३. रात रंगली, रास रंगला<br>४. आला ग वसंत<br>५. वसंत रंगात न्हाला गं<br>६. ऋतू हिरवा, ऋतू बरवा<br>७. कळ्यांचे दिवस,फुलांच्या राती<br>८. साद पावसाची आली<br>९. आली रे वर्षाची होळी<br>१०. जंगलचा मोर<br>११. शुभ्र पक्षी गगन लक्षी<br>१२. लपाछपीचा खेळ खेळता<br>१३. एक साधे गीत गाते<br>१४. शामीचं नाव कंदी घेवान नाय<br>१५. गो मजे बाय<br>१६. चांदणं टिपूर<br>१७. ठावे तुला तरी का?<br>१८. नीज बाळा लौकरी<br>१९. फुलात फुल बाई जाईचं<br>२०. डोंबारी<br>२१. चिव चिव चिमणे<br>२२. ढील दे रे ढील दे<br>२३. पंढरपुरच्या गायी<br>२४. अपंग आम्हा म्हणू नका<br>२५. माती भिडली आभाळा |

**Devrukh Shikshan Prasarak Mandal's**
**Nya. Tatyasaheb Athalye Arts, Ved. S.R. Sapre Commerce and**
**Vid. Dadasaheb Pitre Science College**
**(Autonomous)**
**Devrukh, Dist: Ratnagiri- 415 804, Maharashtra**

# S.Y.B.A.

# (Marathi II)

## AS PER CHOICE BASED CREDIT SYSTEM (C.B.C.S.)

## TO BE FROM THE ACADEMIC YEAR 2022-2023

**Annexure ३.**

**द्वितीय वर्ष कला भाषा आणि भाषाभ्यास मराठी अभ्यासपत्रिका UAMAR32 विषयासाठी**

**तृतीय सत्रात एकूण घटक ३ श्रेयांकने ३ तासिका ४५**

| |
|---|
| **घटक 1. मानवी भाषेचे स्वरूप, एकूण व्याख्याने १५ श्रेयांकने १** |
| **घटक २. अ)भाषा समाज आणि संस्कृती<br>आ) भाषेचा विकास आणि ऱ्हास-संकल्पनाविचार एकूण व्याख्याने १५ श्रेयांकने १** |
| **घटक ३.अ) भाषा, प्रमाणभाषा आणि बोली- संकल्पनाविचार:<br>आ) बोलींच्या अभ्यासाची गरज व महत्व : एकूण व्याख्याने १५ श्रेयांकने १** |

**चतुर्थ सत्रात सत्रात भाषा आणि भाषाभ्यास मराठी अभ्यासपत्रिका UAMAR42 विषयासाठी**

**एकूण घटक ३ श्रेयांकने ३ तासिका ४५**

| |
|---|
| **घटक १. व्याकरण एकूण तासिका १५ श्रेयांकने १<br>वर्णमाला, शब्दांच्या जाती, काळ, लिंग, वचन, प्रयोग, अलंकार, वृत्ते, समास, वाक्यांचे प्रकार, शब्दसंधी, स्वर-संधी, विभक्ती, विरामचिन्हे, विरुद्धार्थी शब्द, वाक्प्रचार, शब्दसमूहाबद्दल एक शब्द, अलंकाराचे प्रकार.** |
| **घटक २. मराठी भाषा आणि आधुनिक तंत्रज्ञान परिचय व प्रात्यक्षिक<br>एकूण तासिका १५ श्रेयांकने १** |
| **घटक ३. पॉवर पॉइन्ट प्रेझेन्टेशन, युनिकोड टंकलेखन एकूण तासिका १५ श्रेयांकने १** |

**मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR32 तृतीय सत्र गुण ७० वेळ २ तास ३० मिनिटे**

| अनु क्र | प्रश्नस्वरूप | गुण |
|---|---|---|
| १ | घटक १. मानवी भाषेचे स्वरूप, दीर्घोत्तरी प्रश्न वा दोन टीपा अंतर्गत पर्यायासह युनिट १ | २० |
| २ | घटक २. अ)भाषा समाज आणि संस्कृती<br>आ) भाषेचा विकास आणि ऱ्हास-संकल्पनाविचार दीर्घोत्तरी प्रश्न वा दोन टीपा अंतर्गत पर्यायासह युनिट २ | २० |
| ३ | घटक ३.अ) भाषा, प्रमाणभाषा आणि बोली- संकल्पनाविचार:<br>आ) बोलींच्या अभ्यासाची गरज व महत्व दीर्घोत्तरी प्रश्न वा दोन टीपा अंतर्गत पर्यायासह युनिट ३ | २० |
| ४ | वरील तीनही युनिटवर आधारित एका वाक्यातील प्रश्न (८ पैकी ५ प्रश्न सोडविणे प्रत्येकी २ गुण) | १० |

**मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR42 तृतीय सत्र गुण ७० वेळ २ तास ३० मिनिटे**

| अनु क्र | प्रश्नस्वरूप | गुण |
|---|---|---|
| १ | घटक १. वर्णमाला, शब्दांच्या जाती, काळ, लिंग, वचन, प्रयोग, अलंकार, वृत्ते, समास, वाक्यांचे प्रकार, शब्दसंधी, स्वर-संधी, विभक्ती, विरामचिन्हे, विरुद्धार्थी शब्द, वाक्प्रचार, शब्दसमूहाबद्दल एक शब्द, अलंकाराचे प्रकार. दीर्घोत्तरी प्रश्न वा दोन टीपा अंतर्गत पर्यायासह | २० |
| २ | घटक २. मराठी भाषा आणि आधुनिक तंत्रज्ञान परिचय व प्रात्यक्षिक दीर्घोत्तरी प्रश्न वा दोन टीपा अंतर्गत पर्यायासह | २० |
| ३ | घटक ३. पॉवर पॉइन्ट प्रेझेन्टेशन, युनिकोड टंकलेखन | २० |
| ४ | वरील तीनही युनिटवर आधारित एका वाक्यातील प्रश्न (८ पैकी ५ प्रश्न सोडविणे प्रत्येकी २ गुण) | १० |